# मराठवाडा विकास मंडळ औरंगाबाद

## नागरिकाची सनद

## भाग-1

महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे कडील आदेश क्रमांक जीएस / जी / 94 / डीबी / 432 दिनांक 30 एप्रिल 1994 अन्वये भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) महामहिम राष्ट्रपती भारत सरकार यांनी त्यांना दिलेल्या आदेशावरुन महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी तीन स्वतंत्र विकास मंडळांची स्थापना करण्यात आली. यापैकी मराठवाडा विकास मंडळ हे एक मंडळ आहे. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 371 व्दारे राष्ट्रपतींनी प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन दिनांक 5 सप्टेंबर 2011 च्या आदेशानुसार मराठवाडा विकास मंडळाची रचना खालील प्रमाणे आहे.

1. अध्यक्षः ( मा. राज्यपाल नियुक्त )
2 राज्य निवड मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष--- पद सिध्द सदस्य
3. औरंगाबाद महसुली विभागातून महाराष्ट्र राज्य विधान मंडळाचा एक सदस्य --- सदस्य
4. मंडळाच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक नागरिक प्राधिकरणातून व स्थानिक ग्रामीण प्राधिकरणातून प्रत्येकी एक सदस्य (आळीपाळीने अडीच वर्षाच्या मुदतीसाठी असेल)
5. सामाजिक - आर्थिक विकासामध्ये कार्यरत असलेल्या अशासकीय संघटना आणि राष्ट्रीय / राज्यस्तरावरील नामवंत संस्था यांच्या प्रतिनिधीसह 5 तज्ञ व्यक्ती --- सदस्य
6. महसूल विभागाचे आयुक्त ---- पद सिध्द सदस्य
7. महसूल विभागाच्या अपर आयुक्ताच्या दर्जा कमी दर्जा नसलेला राज्य शासनाचा अधिकारी --- सदस्य सचिव

**विकास मंडळाची कार्ये :**

**(अ)** मंडळाच्या कार्यक्षेत्राची साधन संपत्ती, गरजा व संधी यांचा विचार करुन आणि संपूर्ण राज्याचा विकास लक्षात घेऊन, त्यांच्या कार्यक्षेत्राच्या संबंधात, सामाजिक-आर्थिक विकासाच्या क्षमतेची निश्चिती करतील,

**(ब)** मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये ज्यांच्यावर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असेल अशी कार्यक्षेत्रे, भाग, लोकसंख्या गट निश्चित करतील,

**(क)** प्रादेशिक / जिल्हा विकास अहवाल तयार करतील आणि ते नियतकालाने अद्ययावत करतील. प्रादेशिक/ जिल्हा विकास अहवालामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल,-

**(एक)** स्थानिक मानवी व नैसर्गिक साधन संपत्तीचे निर्धारण व सामाजिक- आर्थिक विकासा बाबतची क्षमता यांचे पृथ:करण,

**(दोन)** संबंधित सामाजिक -आर्थिक क्षेत्रांच्या विकास निद्रेशांकानुसार महघ्त्वाच्या लोकसंख्या गटांची विकास स्थिती

**(तीन)** आरोग्य, शिक्षण व उपजीविकेचे प्रश्न यांसारख्या मानवी विकास निर्देशांकाच्या विकास स्थितीची संगणना,

**(चार)** प्रदेशांची साधन संपत्ती व त्यांची क्षमता यांच्या आधारे प्रादेशिक विकास योजनेचा आराखडा,

**(पांच)** योजनांतर्गत कार्यक्रमाच्या आणि संपूर्ण प्रादेशिक विकासाच्या निर्धारणावरील व मूल्यमापनावरील परिणाम,

**(ड)** वार्षिक, तसेच पंचवार्षिक योनजेच्या काळात गरजाधारित संतुलित प्रादेशिक विकास विचारात घेऊन विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रावरील विकास खर्चाच्या पातळया सुचवतील,

**(इ)** मंडळाच्या कार्यक्षेत्राच्या सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने तसेच त्या भागातील विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामांचे मूल्यमापन करतील,

**(फ)** मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करतील व तो, महाराष्ट्र राज्य विधान मंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यावर व्यवहार्य असेल तेथवर, तीन महिन्याच्या कालावधीत राज्यपालांना सादर करतील,

# नागरिकाची सनद

## भाग-2

**विकास मंडळाच्या कामकाजाचे संक्षिप्त स्वरुप**

१) **अपर आयुक्त तथा सदस्य सचिवः-**कार्यालय प्रमुख म्हणुन मंडळाचे कामकाज सांभाळणे.
२) **सह संचालक :-** कार्यालयाचे नियंत्रक म्हणुन कामकाज पहाणे.
३) **कार्यासन -1 :-** मंडळाच्या कार्यालयाचे आहंरण व संवितरण अधिकारी म्हणुन काम पहाणे, प्रशासकीय बाबीविषयक कामे करुन घेणे व त्यावर संनियंत्रण ठेवणे. संशोधन अधिकारी या पदाचे अनुषंगाने कामकाज पहाणे.
४) **कार्यासन -२:-** मंडळाकडे प्राप्त होणा-या विशेष निधीचे कामकाज सांभाळणे पहाणे व अनुषंगीक कामे.
५) **कार्यासन-**३:- मंडळाचा प्रशासकिय अहवाल तयार करणे, मंडळाच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन व अनुषंगीक कामे पहाणे, मुल्यमापन अभ्यासाचे काम पहाणे.
६) **कार्यासन-**४:- कार्यालयातील लेखाविषयक सर्व बाबी सांभाळणे.
७) **कार्यासन-**५:- कार्यालयातील लेखाविषयक कामाबाबत सहाय्यक लेखाधिकारी यांना मदत करणे,व रोख रक्कम हाताळणे.
८) **कार्यासन-**६:- कार्यालयातील आस्थापनाविषयक सर्व कामकाज पहाणे.
९) **कार्यासन-**७:- आवक,जावक पत्रव्यवहार सांभाळणे व भाडारविषयक कामकाज पहाणे.
१०) **कार्यासन-**८:-मा.अपर आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक म्हणुन काम पहाणे
११) **कार्यासन-**९:- मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक म्हणुन कामकाज पहाणे.

**मंडळाच्या सेवा/माहीती विषयक बाबी**

| अ.क्र | कार्यालयातर्फे पुरविली जाणारी सेवा/माहीती | आवश्यक कागदपत्राची पुर्तता झाल्यानंतर सेवा/माहीती पुरविण्यासाठी कालावधी | जबाबदार अधिकारी (दुरध्वनी क्रमाकासहीत) | अपील अधिकारी व त्यांच्या दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | सेवा/पदस्थापना/बदली/भरती/पेन्शन/ भ.नि.नि./ वेतनवाढ इत्यादी माहीती | 30 दिवस | प्रशासकीय अधिकारी 0240-2360717 | सह संचालक 0240-2360717 |
| 2 | विकास कामांच्या शिफारशी करणे | बैठकीमध्ये मंजुर झालेल्या कामानां 30 दिवसाच्या आत शिफारस करणे | प्रशासकीय अधिकारी 0240-2360717 | सह संचालक 0240-2360717 |